# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक 2007/(322/07) विशी -4,महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 (1994 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 35) च्या कलम 3 च्या पोटकलम (2) अन्वये दिनांक 27 सप्टेंबर 2011 रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 (सन 2017 चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक 6) द्वारे सचालित राज्यविद्यापीठ)

**(प्र-कुलगुरू कार्यालय)**

डॉ. श्रीराम कावळे
एम. ए.(अर्थशास्त्र), पीएच. डी.,एम. कॉम.,डी. बी. एम.
जे. डी.सी. अँड ए.

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५(म. रा.)
**दूरध्वनी क्र. ०७१३२-२२२२५७**
**E-Mail - provc.gug@gmail.com**

जा. क्र./गो. वि. /

दिनांक : 09/07/2026

## परीपत्रक

**प्रति,**
सर्व प्राचार्य आणि सर्व प्राध्यापक वृंद,
सलग्नीत महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय: महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्या Learning Management System (LMS) वरील 'UG 4.0' ऑनलाईन कोर्समध्ये प्राचार्य व प्राध्यापकांनी अनिवार्य नोंदणी करून कोर्स पूर्ण करण्याबाबत.**

**संदर्भ :** १. उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिस/UG4.0कोर्सबाबत/विशि/2026/ई-1007, दिनांक 06/07/2026.
२. महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांचे परिपत्रक.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षाची (Honours / Honours with Research) प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांनी त्यांच्या **Learning Management System (LMS)** वर **"UG 4.0"** हा विशेष ऑनलाईन प्रशिक्षण कोर्स विकसित केला आहे.

उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार **गोंडवाना विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांतील प्राचार्य व सर्व प्राध्यापक यांनी सदर "UG 4.0" ऑनलाईन कोर्समध्ये नोंदणी करून कोर्स पूर्ण करणे अनिवार्य आहे.**

त्यामुळे सर्व प्राचार्य व प्राध्यापक यांनी **विहित कालावधीत शंभर टक्के नोंदणी करून ऑनलाईन कोर्स पूर्ण करावा**, अशी सूचना संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केलेली आहे.

सदर सूचना अत्यंत महत्त्वाची असून, सर्व संबंधितांनी याची तात्काळ दखल घ्यावी व नोंदणी पूर्ण करून कोर्स पूर्णत्वास न्यावा. तसेच आपल्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांची नोंदणी व कोर्स पूर्णत्वाची खात्री करून त्याचा अहवाल विद्यापीठास सादर करावा. या बाबीस प्राधान्याने कार्यवाही करावी.

अहवाल सादर करण्याकरीता लिंक/QR Code: https://forms.gle/oTyGkBM1UQHKCtT48

SCAN ME

डॉ. श्रीराम कावळे
(प्र-कुलगुरू)

**डॉ. श्रीराम श्रा. कावळे**
**प्र-कुलगुरु**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

प्रतीलीपी:-

1. मा. कुलगुरू महोदयांच्या माहितीसाठी.
2. मा. कुलसचिव महोदयांच्या माहितीसाठी.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E.mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्र.उशिसं/UG4.0कोर्सबाबत/विशि/२०२६/ई १००८ दि. 06 JUL 2026

प्रति,

1. सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य.
2. सर्व कुलसचिव, राज्य सार्वजनिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय : महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्या LMS वर उपलब्ध असलेल्या 'UG4.0' ऑनलाईन कोर्समध्ये महाविद्यालयीन प्राचार्य, महाविद्यालयीन व विद्यापीठीय अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनिवार्य नोंदणी करणेबाबत.**

**संदर्भ : १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/ई-१६०९७२२/विशि-३, दिनांक ०६ एप्रिल २०२६.**

**२. महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था यांनी जारी केलेले परिपत्रक क्र. मराअविसं/का.सं./२०२६-२७/**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP २०२०) च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील चौथे वर्ष (Honours व Honours with Research) लागू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्न/स्वायत्त महाविद्यालयांमध्ये चौथ्या वर्षाच्या Honours व Honours with Research अभ्यासक्रमाची प्रभावी, सुसूत्र व एकसमान अंमलबजावणी सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदी, चौथ्या वर्षाच्या Honours व Honours with Research अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे तसेच संबंधित शैक्षणिक व प्रशासकीय बाबींची माहिती राज्यातील महाविद्यालयीन प्राचार्य, महाविद्यालयीन व विद्यापीठीय अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांनी Learning Management System (LMS) वर 'UG 4.0' हा विशेष ऑनलाईन कोर्स विकसित केला आहे. सदर कोर्सचे उद्घाटन श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील चौथे वर्ष (Honours व Honours with Research) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून लागू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या महत्त्वपूर्ण शैक्षणिक सुधारणेची प्रभावी व एकसमान अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी MSFDA च्या LMS वर विकसित करण्यात आलेला 'UG 4.0' हा ऑनलाईन कोर्स महाविद्यालयीन प्राचार्य, महाविद्यालयीन व विद्यापीठीय अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पूर्ण करणे अनिवार्य आहे. शासन निर्णयातील तरतुदी, अंमलबजावणीची कार्यपद्धती तसेच विविध शैक्षणिक व प्रशासकीय बाबींचे सविस्तर मार्गदर्शन या कोर्समध्ये उपलब्ध आहे. सदर कोर्स MSFDA च्या LMS वर उपलब्ध असल्यामुळे इतर राज्यांतील उच्च शिक्षण संस्थांतील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व इतर संबंधित घटकांनाही त्याचा लाभ घेता येणार असून राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तो उपयुक्त ठरेल.

तरी सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) तसेच सर्व कुलसचिव, राज्य सार्वजनिक विद्यापीठे यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील/विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालयांना याबाबत तात्काळ अवगत करून सदर कोर्समध्ये प्राचार्य व प्राध्यापकांची शंभर टक्के नोंदणी व कोर्स पूर्णत्व सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

Scanned with OKEN Scanner

सदर कोर्समध्ये नोंदणी केलेल्या तसेच कोर्स पूर्ण केलेल्या प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा विभागनिहाय व विद्यापीठनिहाय आढावा चालू महिन्याच्या अखेरीस मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांना सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांपर्यंत सदर माहिती पोहोचवून अपेक्षित प्रमाणात नोंदणी व कोर्स पूर्णत्व सुनिश्चित करण्यात यावे.

अधिक माहितीसाठी किंवा काही तांत्रिक अडचण आल्यास श्री. कबीर पळशीकर, व्यवस्थापक (नेटवर्किंग), MSFDA यांना 7262079089/8308381840 या क्रमांकावरती संपर्क करावा.

(डॉ. शैलेन्द्र देवळाणकर)
संचालक (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर-

मा. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे - १६

Scanned with OKEN Scanner


Maharashtra State Faculty Development Academy

# LMS UG 4.0 Course Registration Process

## Step 1:


Open the MSFDA website **www.msfda.ac.in** click Login and then select "Faculty Portal Login"

Click on "Login" and then select "Faculty Portal Login"



# Step 2:


click Register Here




Complete the verification process, enter your email address and mobile number, create a password, fill in your personal and institutional details, then return to the login page, enter your Login ID and Password, and click "Login".

# Step 3:

Select 'Online LMS Courses'.




# Step 4:

<u>Click 'Know More' to view course details.</u>




# Step 5:

Tick the checkbox to accept terms, then click 'Enroll Now'.




# Step 6:

<u>Click 'View QR Code' to display the payment QR.</u>




# Step 7:

Click 'Continue to Payment'.




# Step 8:

<u>Scan the QR code using any UPI app and complete the payment.</u>



# Step 9:

After successful payment, return to the LMS and verify your enrollment.



Maharashtra State
Faculty Development Academy

# Step 10:

Open 'My Courses', start learning, complete all modules, quizzes, and download your certificate.

